# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| 1 | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नांदेड |
| 2 | पोलीस स्टेशन | पो.स्टे लोहा जि.नांदेड |
| 3 | गुरनं व कलम | गु.र.नं.४७/२०२६ कलम ७ भ्र.प्र.अ. १९८८ |
| 4 | तक्रारदार | पुरुष, वय ५५ वर्षे |
| 5 | आरोपी लोकसेवक | श्री. दिगांबर रामचंद्र शिंदे, वय ५७ वर्षे, केंद्र प्रमुख शिक्षक (गट क), मूळ नेमणूक जिल्हा परिषद शाळा, रिसनगांव, ता.लोहा, जि.नांदेड सध्या नेमणूक गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती लोहा, जि. नांदेड, रा.रिसनगाव, ता.लोहा, जि.नांदेड, ह.मु. मुक्ताईनगर, लोहा, जि.नांदेड |
| 6 | गुन्हा घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक १६.०२.२०२६ रोजी चे १०.१४ ते १०.३१ वाजताचे दरम्याण गट शिक्षण अधिकारी कार्यालय लोहा जि. नांदेड येथे |
| 7 | गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक १६.०२.२०२६ रोजी १६.४७ वाजता स्टे.डा नोंद नं २५ वर |
| 8 | मागणी केलेली रक्कम | ३०००/— रुपये |
| 9 | स्विकारलेली रक्कम | ३०००/— रुपये |
| 10 | **थोडक्यात माहिती** – दिनांक १२/०२/२०२६ रोजी यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, तक्रारदार सन २०१८ पासून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाद्रा, ता. लोहा, जि.नांदेड येथे प्राथमिक शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. तक्रारदारांनी त्यांच्या खाजगी कारणास्तव दिनांक ०९/०२/२०२६ रोजी (४६) दिवसाची अर्जित रजा मंजूर होण्याकरिता गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय लोहा, जि.नांदेड येथे अर्ज दिला होता. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रिसनगांव, ता.लोहा, जि. नांदेड येथील दिगंबर शिंदे, पद केंद्र प्रमुख हे पंचायत समिती लोहा कार्यालयाचे आस्थापना विभागामध्ये लिपिकाचे काम तसेच गटशिक्षणाधिकारी व्यवहारे यांचे सर्व कार्यालयीन कामे पाहतात. त्यामुळे तक्रारदार यांनी दिनांक ११/०२/२०२६ रोजी त्यांची अर्जित रजा मंजूर झाली की नाही हे पाहण्यासाठी पंचायत समिती लोहा कार्यालय येथे जाऊन केंद्र प्रमुख शिंदे यांची भेट घेऊन त्यांना तक्रारदाराची अर्जित रजा मंजुरी विषयी विचारणा केली. तेव्हा शिंदे यांनी तक्रारदार यांना अर्जित रजा मंजूर करण्यासाठी स्वत:साठी व गटशिक्षणाधिकारी व्यवहारे यांच्यासाठी ४,०००/— रुपये द्यावे लागतील, पैसे दिले तरच तुमची अर्जित रजा मंजूर होईल असे म्हणून तक्रारदार यांना लाचेची मागणी केली आहे, अशा मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी दिली.<br>दिनांक १३/०२/२०२६ रोजी तक्रारदार यांना शासकीय पंचासह गटशिक्षणाधिकारी व्यवहारे यांची भेट घेण्यासाठी गटशिक्षणाधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग,पंचायत समिती लोहा येथे पाठविले असता, गटशिक्षणाधिकारी व्यवहारे यांनी तक्रारदार यांना, तुम्ही पहिले मुख्याध्यापक पदाचा पदभार घेऊन टाका मग तुमची अर्जित रजा मंजूर करतो असे सांगितले. तेव्हा तक्रारदार हे त्यांचे कार्यालयातून परत निघाले असता, त्यांचे पाठीमागे केंद्र प्रमुख दिगांबर शिंदे हे आले व तुमची अर्जित रजा मंजूर करायची असेल तर मला दोन–तीन हजार रुपये देऊन टाका असे म्हणून लाचेची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी केव्हा देऊ असे विचारले असता, केंद्र प्रमुख शिंदे यांनी उद्या द्या, परवा द्या, तुमच्या मनाने कधी पण द्या असे म्हणून स्वत:साठी ३०००/— रुपये लाचेची मागणी केली.<br>दिनांक १६/०२/२०२६ रोजी तक्रारदार यांना शासकीय पंचासह केंद्रप्रमुख दिगांबर शिंदे यांच्याकडे ३०००/— रुपये लाचेच्या रकमेसह गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती, लोहा येथे पाठविले. तेथे तक्रारदार यांनी केंद्रप्रमुख शिंदे यांची भेट घेऊन तुम्ही म्हणल्याप्रमाणे ३०००/— रुपये आणले आहेत असे सांगितले. तेव्हा केंद्रप्रमुख शिंदे यांनी गटशिक्षणाधिकारी यांच्याकडून तक्रारदार यांची अर्जित रजा मंजूर करून देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडून स्वत:साठी ३०००/— रुपये लाच स्वीकारताना रंगेहाथ मिळून आले आहेत. म्हणुन पोस्टे लोहा नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. | |

सदरची सापळा कारवाई मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्या मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. नांदेड चे पोलीस उप अधीक्षक प्रशांत पवार, पोलीस निरीक्षक श्रीमती अनिता चव्हाण व नांदेड युनिट पथक यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

**१) संदीप पालवे, पोलीस अधीक्षक** — ०२४६२ — २५५८११, मो.नं. ९२२६४८४६९९
**२) श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक** — ०२४६२ — २५५८११
**३) श्री प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक** — मो.नं. ९३५९०५६८४०.
**४) टोल फ्रि** — १०६४

५) ला.प्र.वि. नांदेड दुरध्वनी क्रमांक – ०२४६२ – २५३५१२
६) Website – www.acbmaharashtra.gov.in
७) Mobile App – www.acbmaharashtra.net
८) Facebook Page – www.facebook.com/maharashtraACB
९) Twitter – @ACBnanded
१०) Instagram – acb_nanded
११) Youtube Cahnnel – @AntiCorruptionBureauNanded
१२) whats App number – ८९५५५०१०६४

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड